" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

कोल्हापूर

## अ ह वा ल

## मतदान जनजागृती मोहीम, २०२४

शनिवार दि.16.11.2024 रोजी विवेकानंद कॉलेज व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार मतदान जनजागृती मोहीम कार्यक्रम राबविण्यात आला. कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनानुसार दुपारी 12.30 वाजता कॉलेजची विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक जवळजवळ 70 ते 80 विद्यार्थी या जनजागृती कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. सदर रॅलीची सुरुवात कॉलेजपासून झाली व त्यानंतर नागाळा पार्क, ताराबाई पार्क, जिल्हा परिषद मार्गे विवेकानंद कॉलेज पुन्हा कॉलेजमध्ये विद्यार्थी व स्वयंसेवक दाखल झाले. सदर रॅलीमध्ये मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या घोषणांचा वापर करून आपल्या मतदानामुळे लोकशाहीला बळकट कसे करता येईल याविषयी विद्यार्थ्यांनी समाज व व्यक्ती यांचे उद्बोधन केले.

समाजाला मतदानाचे महत्त्व पटवून देताना भारतीय लोकशाही व संविधान व आपल्याला मिळालेला मतदानाचा अधिकार हा किती महत्त्वाचा आहे हे विद्यार्थ्यांनी या रॅलीच्या माध्यमातून जाणीव जागृती करून दिली.

मतदान करणे हा जसा आपला अधिकार आहे त्याप्रमाणे नवीन यंत्रसामग्रीचा मतदानावेळी कसा वापर करायचा हे समजून घेण्यासाठी कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी नवीन पद्धतीच्या मतदानाची माहिती मिळवण्यासाठी ए व्ही एम मशीनची हाताळणी कशी करावी ? मतदान कसे करावे ? मतदान करताना येणाऱ्या समस्या व गैरसमज दूर करून घेतले.

देशाचे भवितव्य देशाची लोकशाही बळकट झाल्याशिवाय उज्वल होणार नाही. पैशानी मते विकत घेऊन अयोग्य उमेदवाराची निवड केल्याने देशाची लोकशाही व संविधान यांचा पाया खचल्याशिवाय राहणार नाही. यासाठी सर्वांनी स्वाभिमानाने व जिद्दीने आपला मतदानाचा अधिकार निस्वार्थ भावाने मिळविला पाहिजे हे विद्यार्थ्यांनी समाजातील व्यक्तीला या जनजागृती मोहिमेतून पटवून दिले.

सदर मतदान जनजागृती मोहीम कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार, कॉलेजचे प्रबंधक श्री आर बी जोग यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. एल. एस.नाकाडी, जुनिअर सायन्स विभाग प्रमुख प्रा.एम आर नवले, प्रा.सौ. जी एस साळुंखे, प्रा.घाटगे, प्रा एस एस जगताप, प्रा.सौ पंचभाई , प्रा सौ.सी.सी.पाटील तसेच या मतदार जनजागृती मोहीम कार्यक्रमास श्री शिवाजी दिवाळे व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्यांचेही सहकार्य लाभले. शंभर टक्के मतदानाचा अधिकार बजावून लोकशाहीला भक्कम बनविण्यासाठी शासनाच्या उपक्रमा अंतर्गत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले गेले.

श्री एल. एस.नाकाडी
**PROGRAMME OFFICER**
**N. S. S + 2**
**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR**

डॉ.आर.आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-400 001.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.022-22679565

तात्काळ

क्रमांक:रासेयो-2023/प्र.क्र.186/रासेयो कक्ष दिनांक: 08 नोव्हेंबर, 2024

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक
राष्ट्रीय सेवा योजना,
सर्व विद्यापीठ/ संचालनालये

विषय :- राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत मतदान जनजागृती अभियान राबविणे बाबत.

उपरोक्त विषयानुसार राज्यात दिनांक 20 नोव्हेंबर, 2024 रोजी होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत राज्यातील मतदारांच्या मतदानातील टक्केवारीच्या प्रमाणात वाढ होण्याच्या अनुषंगाने आपल्या विद्यापीठातर्गत महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांमार्फत मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याच्या दृष्टीने मतदान जनजागृती अभियान राबविण्याबाबत आपल्यास्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सहकार्यास्तव राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातर्गत मतदान जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. आपल्या विद्यापीठातर्गत महाविद्यालय व महाविद्यालया बाहेरील परिसरात जास्तीत जास्त नाविन्यपूर्ण पध्दतीने जनजागृती, प्रसार-प्रचार करण्यात यावा. चौकाचौकात मतदान जागृतीस्तव पथनाट्य, रॅली, फ्लेक्स इ. प्रभावी साधनांचा वापर करण्यात यावा. बॅनर, फ्लेक्सवर **MY BHARAT PORTAL** चा **LOGO** दर्शनीभागावर प्रिन्ट करावा. नागरिकांचा मतदान प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग वाढावा यासाठीच्या उपाययोजना राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत करण्यात याव्यात.

नागरिकांमध्ये मतदान विषयक जनजागृती करण्यासाठी स्वीप SVEEP (Systematic Voter's Education and Electoral Participation) कार्यक्रम राबविण्यात येतो. त्यानुषंगाने सदर स्वीप कार्यक्रमातर्गत राज्यातील सर्व रासेयो संलग्न विद्यापीठ/महाविद्यालया मधील निवडणूक साक्षरता मंडळाचे सक्षमीकरण करुन त्याव्दारे मतदान विषयक उपक्रम राबविण्यात यावेत. मतदान जागृती विषयक सर्व उपक्रमांची MY BHARAT PORTAL वर नोंद घेणे क्रमप्राप्त असेल. जनजागृतीसाठी केलेल्या कृतीचे विविध प्रकारचे फोटो तसेच प्रत्येक कृती MY BHARAT PORTAL वर अपलोड करण्यात यावी. रासेयो संलग्न विद्यापीठाने मतदान जनजागृतीसाठी केलेल्या सर्व प्रत्यनांचे संकलन एक ते दोन मिनिटांपर्यंतच्या व्हिडीओमध्ये करुन सदर व्हिडीओ MY BHARAT PORTAL वर अपलोड करावा. याबाबत आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल रासेयो क्षेत्रिय संचालक पुणे व या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

(डॉ. निलेश पाठक)
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी
रासेयो कक्ष,मंत्रालय,मुंबई

शिक्षण उपसंचालक कार्यालय,
-: कोल्हापूर :-
आवक क्रं. 2516 शाखा ...
11 NOV 2024
प्राप्त दिनांक ...
स.अ. क.प्र.अ. शि.उ.सं.

प्रा नाकुर्डे
12/11/2024
उमं-3

# मतदान जनजागृती मोहिम

दि. 16.11.2024









मतदान जनजागृती मोहिम
MY BHARAT
होय मी मतदान करणारच
मतदान करा.


श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने
VOTE
मतदान जनजागृती मोहिम
MY BHARAT
होय मी मतदान करणारच
लोकशाहीचा जागर व संविधानाचा आदर तुम्हाला करावाच लागेल, उठा जागे व्हा
आणि लोकशाही बळकट करण्यासाठी स्वाभीमानाने व जिद्दीने
मतदान करा.


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
NCC

दै. पुढारी My Kolhapur रविवार 17 नोव्हेंबर, 2024

# विवेकानंद कॉलेजतर्फे मतदान जनजागृती

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद महाविद्यालयाच्या वतीने समाजातील मतदारांमध्ये 'माझे मत, माझा अधिकार' याची जाणीव करून देण्यासाठी व मतदानाचे पवित्र कर्तव्य बजाविण्यासाठी नागळा पार्क ते विवेकानंद कॉलेज अशी मतदान जनजागृती मोहीम राबविण्यात आली. यास नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते मतदान जनजागृती मोहिमेचे उद्घाटन झाले. विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मताचे महत्त्व पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या घोषणांच्या ब्रीद वाक्यांच्या माध्यमातून समाजामध्ये मतदान करणे पवित्र कर्तव्य कसे आहे? हे मतदारांना पटवून दिले. कॉलेजचे प्रबंधक आर. बी. जोग, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. एल एस नाकाडी, प्रा. आर. व्ही. घाटगे, प्रा. जी. एस. साळुंखे, प्रा. एस. एस. जगताप, प्रा. एस. पी. पंचभाई, प्रा. सी. सी. पाटील, विद्यार्थी सहभागी झाले होते.